प्रो. डॉ. विलास दौलतराव आवारी गौरव ग्रंथ

# भारतीय लोकशाहीची ७५ वर्षे: समीक्षा



संपादक

डॉ. विलास विठ्ठल नाबदे

**भारतीय लोकशाहीची ७५ वर्षे : समीक्षा**

ISBN : 978-93-93366-04-7

© संपादक

**प्रकाशक :**
सौरभ सिंग
**पुनम पब्लिकेशन**
१२३/१, बी-ब्लॉक, गल्ली नं. ८, भैजनपुरा,
दिल्ली - ११० ०५३

**टाईपसेटींग :**
दिनेश बोरीकर
डाटा-लाईन कॅम्प्युटर्स,
५८३, हंसापूरी, छोटी खदान, नागपूर- १८.
मो. ९३७११५०४६७

**मुद्रक**
पुनम पब्लिकेशन
दिल्ली - ११० ०५३

किंमत : **११०० रुपये**

---

(ग्रंथातील लेखांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.)

| | | |
|---|---|---|
| २४. भारताचे संविधान व लोकशाही | - नामदेव अशोक पवार<br>कैलास विठ्ठल शिंदे | १३३ |
| २५. 'भारतीय लोकशाहीचा व्यवहार आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार' | - डॉ. गणेश सुकदेव रोडे | १३८ |
| २६. भारतीय लोकशाही आणि सामाजिक परिणाम | - डॉ. नंदकिशोर उगले | १४७ |
| २७. लोकशाही पुढील आव्हाने | - डॉ. अभिजित पाटील | १५२ |
| २८. लोकशाही : एक विचारप्रणाली | - डॉ. प्रमोद राजेंद्र तांबे,<br>डॉ. सुवर्णा रामदास गारुडकर | १६० |
| २९. भारतातील लोकशाहीचे वास्तव | - विजया अशोक कोळेकर | १६७ |
| ३०. भारतीय लोकशाही आणि पक्षीय वाटचाल | - ठोकळ रमेश गणपत<br>डॉ. काळे संजय अंकुश | १७३ |
| ३१. भारतीय लोकशाहीचे संरक्षण | - अरूण अंबादास पोटे,<br>दिपक खुर्चे | १८८ |
| ३२. भारतीय लोकशाही आणि निवडणुका | - हारदे चंद्रकांत गोरक्षनाथ | १९१ |
| ३३. भारतीय लोकशाही मूल्यव्यवस्था : धर्माधिष्टीत सत्तेची स्पंदने | - डॉ. श्रीकांत देशमुख | १९५ |
| ३४. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत भारतीय लोकशाही आणि सद्यस्थिती | - कु. प्रणिता अरुण पारखे | २०३ |
| ३५. महाराष्ट्राच्या लोकशाही राजकारणाची वाटचाल - १९६० ते २०२२ | - डॉ. राजेंद्र दिलीप आगवाने | २०८ |
| ३६. जागतिकीकरणानंतर भारतातील लोकशाहीचा प्रवास: पेसा कायद्याच्या निमित्ताने | - खोकले डी. एल. | २१८ |
| ३७. भारतीय लोकशाही आणि लोकसभा सार्वत्रिक निवडणुका | - अर्चना फुलारी | |
| ३८ भारतीय लोकशाही आणि जागतिकीकरण | - प्रो. डॉ. राजकुमार रिकामे<br>विकास सुभाष नालकर | २३८ |
| ३९. यशस्वी भारतीय लोकशाहीचा मार्ग: एक शोध | - श्याम निवृत्ती गुळवे | २४३ |
| ४०. भारतीय लोकशाही आणि जागतिकीकरण | - वीरेंद्र शंकर धनशेट्टी | २४७ |
| ४१. भारतीय लोकशाहीचा विकास | - डॉ. संभाजी तनपुरे | २५६ |
| ४२. भारतीय राजकीय व्यवस्था | - डॉ. एकनाथ सिताराम निर्मल | २६२ |
| ४३. अमृतमहोत्सवी वर्षात पदार्पण करताना | - डॉ. सुरेश देवरे | २६७ |
| ४४. भारतीय पक्ष पद्धतीची वाटचाल एक चिकित्सक अभ्यास | - ए. बी. राऊत | २७३ |
| ४५ महाराष्ट्राच्या राजकारणाचा आढावा | - फलके ए.बी. | २७७ |

:: ३५ ::

# महाराष्ट्राच्या लोकशाही राजकारणाची वाटचाल – १९६० ते २०२२

**डॉ. राजेंद्र दिलीप आगवाने**
राज्यशास्त्र विभाग, गुरुवर्य मामासाहेब दांडेकर
कला, भगवंतराव बाजे वाणिज्य आणि विज्ञान
महाविद्यालय सिन्नर नाशिक.

**प्रस्तावना :**

भाषावार प्रांत रचनेच्या चळवळीमधून राजकारणाला कलाटणी मिळालेल्या राज्यांपैकी महाराष्ट्र हे एक राज्य आहे. तसेच देशातील प्रगत म्हणून गणल्या जाणाऱ्या राज्यांमध्ये महाराष्ट्राचा समावेश होतो. मुंबईसाठी झगडून ते महानगर आपल्या राज्याचा भागच नव्हे तर राजधानी बनविण्यात मराठी जनतेला यश मिळाले आणि त्या यशामुळे काही राजकीय प्रश्न जसे निर्माण झाले तसेच त्या यशामुळेच महाराष्ट्राच्या संपत्तीमध्ये आणि विकासाच्या निर्देषांकांत भरघोस वाढ देखील झाली आहे. वसाहतपूर्व इतिहासात महाराष्ट्रातील राज्यकर्त्यांचा देशाच्या अनेक भागात मोठा दबदबा राहिलेला आहे. त्याची पायाभरणी छत्रपती शिवाजी महाराजांच्या कर्तबगारीतून झाली १८ व्या शतकात मराठा राजवटीने आणि त्यातून पुढे आलेल्या अनेक सरदारांनी आणि राज्यकर्त्यांनी देशाच्या विविध भागामध्ये आपला राजकीय अधिकार प्रस्थापित केला. समतेच्या मुद्दयावर तसेच जातीभेद, स्त्री-पुरूष विषमता या दोहोंवर भर देऊन क्रांतिकारी परिवर्तनाचा पाठपुरावा करणारी महात्मा फुले यांची सत्यशोधक चळवळ ही सर्वाधिक महत्वाची मानता येईल. तसेच शाहू महाराजांच्या न्यायाची भूमिका त्यामुळे आणि त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या २० व्या शतकातील राजकीय आणि वैचारिक क्षेत्रातील कर्तृत्वामुळे महाराष्ट्र हे एक पुरोगामी व सुधारणावादी अशी राहीलेली आहे. १९५२ च्या पहिल्या निवडणुकीपासून २०१४ पर्यंत एकूण सहा दशकात केवळ सात वर्ष सोडली तर राज्यात काँग्रेस पक्षाचे सरकार राहिले आहे. संयुक्त महाराष्ट्र चळवळीने महाराष्ट्राच्या राजकारणाचा पाया भक्कम केला.

भाषिक निकषावर महाराष्ट्र राज्य मुंबईसह १ मे १९६० रोजी निर्माण झाले. संयुक्त महाराष्ट्र चळवळीने महाराष्ट्राच्या राजकारणाचा पाया भक्कम केला. भाषिक निकषावर महाराष्ट्र राज्य मुंबईसह मे १९६० रोजी निर्माण झाले. द्विभाषिक राज्याला महाराष्ट्रातील सर्व पक्षांनी विरोध केला होता व संयुक्त महराष्ट्र चळवळ काँग्रेस विरोधात लढली. संयुक्त महाराष्ट्राला काँग्रेसचा विरोध असला तरी महाराष्ट्रातील अनेक काँग्रेस नेते संयुक्त महाराष्ट्र निर्मीतीच्या बाजूने होते. शेवटी काँग्रेसला मराठी प्रदेशात पराभव पत्कारावा लागला कारण मराठी अस्मिता हा राजकारणाचा महत्वाचा घटक बनला.

शिवाजी महाराज मराठी भाषा इत्यादी प्रतिकांच्या आधारे प्रादेशिक अहंकाराची आक्रमक मांडणी केली गेली. महाराष्ट्र निर्मितीनंतरही बेळगांव व कारवार या मराठी भाषिक प्रदेशांचा प्रश्न अनिर्णीत राहिला. १९६० नंतरचे महाराष्ट्राचे राजकारण मुंबई अंतर्गत प्रश्न, प्रादेशिक विकासामधील असमतोल, मराठा-कुणबी समाजाचे राजकारणातील मध्यवर्ती स्थान व कॉंग्रेस वर्चस्वाचे राजकारण या मुद्याभोवती घडले आहे. महाराष्ट्राच्या लोकशाही राजकारणाचा सविस्तर अभ्यास करण्यासाठी पुढील मुद्दे विचारात घेता येतील.

**कॉंग्रेसचे एकपक्षीय वर्चस्व: बेरजेचे राजकारण :**

१९५६ मध्ये द्विभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण झाले. मुंबईसह मराठी भाषिक प्रदेशांचे वेगळे महाराष्ट्र राज्य निर्माण व्हावे या मागणीसाठी राजकीय आंदोलन अधिक तीव्र बनले कॉंग्रेस व्यतिरिक्त सर्व पक्ष एकत्र आले. याच काळात डाव्या विचारांचा ग्रामीण भागात सामाजिक आधार असणारा शेतकरी कामगार पक्ष १९४८ मध्ये स्थापन झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अनुयायांनी १९५७ मध्ये रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडीया या पक्षाची स्थापना केली. १९५७ च्या निवडणुकीत संयुक्त महाराष्ट्र समीतीला भरघोस यश मिळाले परंतु पक्षीय राजकारणावर याचा फारसा परिणाम झाला नाही. १९६० नंतर यशवंतराव चव्हाणांनी महाराष्ट्रात कॉंग्रेसचा विस्तार व करण्यासाठी समाजातील सर्व मध्ये सत्तेमध्ये वाटा देण्यावर त्यांनी भर दिला त्यामुळे संधीसाधूपणाने राजकारण करू पहाणाऱ्या पक्षांच्या राजकारणावर मर्यादा पडल्या महाराष्ट्रातील कॉंग्रेस विकास सहमती व लोककल्याणाच्या आधारावर राजकारण करते आहे. असे चित्र उभे राहिले. कॉंग्रेस वर्चस्वाचा आधार पुढील कारणामुळे दिसून येतो.

१) राजेश्वरी देशपांडे यांच्या मते, महाराष्ट्रामध्ये कुणबी-मराठा जात वर्चस्वशील मानली जाते. त्यांचे महाराष्ट्रभर अस्तित्व, लोकसंख्येतील सर्वाधिक वाटा असणारा हा मोठा गट कॉंग्रेसमध्ये सामील झाल्यामुळे कॉंग्रेस पक्षाचा पाया विस्तारला यशवंतराव चव्हाणांनी खानदानी मराठा नेतृत्वासोबतच इतर मराठा समाजातील कार्यकर्त्यांना सत्तेचा मार्ग मोकळा करून दिला.

२) महाराष्ट्रातील ज्या ठिकाणी बिगर मराठा समाजाचे वर्चस्व असेल तेथे स्थानिक पातळीवर बिगर मराठा समाजाला सत्तेत सहभागी करून घेतले त्यामुळे त्या जातीही त्यांच्या सोबत आल्या एकजातीय वर्चस्व असूनही राजकीय अभिजनांचे स्वरूप बहुजातीय राहिले.

३) दलित समूहाला आपल्याकडे आकर्षित करण्यासाठी रिपब्लिकन पक्षातील दादासाहेब गायकवाड गटासोबत १९६७ मध्ये कॉंग्रेसने युती केली. आर. डी. भंडारे यांच्या गटाने स्वतःला कॉंग्रेसमध्ये विलीन करून घेतले. यामुळे १९६७ च्या जिल्हापरिषद निवडणुकीत कॉंग्रेसने रिपाईसाठी १०% जागा सोडल्या. दलितांसोबतच आदिवासी आणि मुस्लीम समाज कॉंग्रेससोबत स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच होता.

४) १९५७ नंतर कांग्रेस सरकारने शेतकरी आणि ग्रामीण विकासासाठी अनेक सहकारी संस्थांना प्रोत्साहन दिले. त्यामध्ये सहकारी साखर कारखाने, सहकारी सूत गिरण्या, सहकारी बँका इ. संस्थांचा उदय झाला. त्याचबरोबर या सहकारी संस्था शासनबाह्य सत्तेची केंद्र बनली. या सर्व सहकारी संस्थावर कॉंग्रेसने वर्चस्व प्राप्त केले व स्थानिक राजकारणाची सूत्रे स्वतःकडे ठेवली.

५) यशवंतराव चव्हाणांचे बेरजेचे राजकारण किंवा चव्हाण मॉडेल हे महाराष्ट्राच्या राजकारणात प्रसिद्ध आहे किंवा यालाच बहुजन समाजाचे राजकारण म्हणून ओळखले जाऊ लागले हे राजकारण यशस्वी होण्यामध्ये सामाजिक, आर्थिक, संस्थात्मक व वैचारिक घटक कारणीभूत होते. विरोधी पक्षातील नेते आणि कार्यकर्त्यांना काँग्रेसमध्ये आणण्यालाच बेरजेचे राजकारण म्हटले जाऊ लागले. मराठा समाज हा महाराष्ट्राच्या हितासाठी काँग्रेसमध्ये सामील होणे किती आवश्यक आहे यावर भर दिला. थोडक्यात मराठा नेतृत्व बहुजन समाजाच्या संकल्पनेतून तिला मिळालेले वैचारिक, सांस्कृतिक पाठबळ, संस्थात्मक आधार आणि विसंगती आर्थिक हितसंबंधाची काँग्रेसने कसोशीने घडवलेली सांधेजोड या चौकटीत काँग्रेस पक्षाचे प्रादेशिक राजकरण साकारले. (देशपांडे, २००७, पृ.२३) १९६६ मध्ये मुंबईतील मराठी भाषिक व मराठी भाषिक अस्मितेच्या आधारे शिवसेना पक्षाची स्थापना बाळासाहेब ठाकरे यांनी केली. मुंबईतील मराठी लोकांची कैवारी संघटना म्हणून शिवसेना उभी राहिली ही सुरुवातीला अराजकीय संघटना होती. शिवसेनची भूमिका सुरुवातीपासूनच काँग्रेस विरोधी राहिलेली आहे.

**नव सामाजिक चळवळींचा उदय :**

काँग्रेस विकासासोबतच नव्या सामाजिक व राजकीय चळवळीचा विकास १९६० नंतर सुरु झाला होता. रिपब्लीकन पक्ष अनेक गटांमध्ये विभागला गेला. दलित नेत्यांमध्ये ऐक्य राहिले नाही, नेतृत्वाचे काँग्रेसीकरण झाले. त्यामुळे दलित समाजाचे प्रश्न सोडवण्याची क्षमता या पक्षात नाही असा भ्रमनिरास होऊन दलित तरुणांनी 'दलित पँथर' ही संघटना १९७२ मध्ये स्थापन केली. भूमीहीन शेत मजुरांचा प्रश्न, विद्यापीठ नामांतर लढा, मंडल आयोगाचा लढा, नोकऱ्यातील अनुशेष, शिष्यवृत्ती वाढवणे यासारखे प्रश्न हाताळले. दुसरीकडे शिक्षण क्षेत्रातील भ्रष्टाचार विरोधासाठी आणि भांडवलशाही, जातीव्यवस्था, स्त्रीदास्य, बेरोजगारी याला विरोध करण्यासाठी युथ ऑरगनायझेशन (युवक क्रांती दल) या महाविद्यालयीन युवकांची संघटना उभी राहिली तसेच बाबा आढाव यांच्या नेतृत्वाखाली असंघटित कष्टकऱ्यांच्या संघटनेमार्फत हमाल पंचायत १९५५, धरणग्रस्तांना न्याय मिळण्यासाठी धरणग्रस्त चळवळ १९६२ आणि एक गाव एक पाणवठा, पालखी सत्याग्रह, विद्यापीठ नामांतर लढा यासारखे प्रश्न त्यांनी हाताळले. १९७८ ते ८८ हा कालखंड शरद जोशी यांच्या शेतकरी संघटनेने गाजविला. शेतीमालाला किमान आधारभूत किंमत मिळवण्यासाठी कांदा, ऊस, तंबाखू, दूध, कापूस उत्पादकांची शेतकऱ्यांची आंदोलने महाराष्ट्रात ठिकठिकाणी घडवून आणली. लाल निशाण गटाने शेतमजूर, शेतकरी, ऊस तोड कामगार लोकांचे प्रश्न हाती घेऊन त्यांना न्याय देणाऱ्या संघर्षशील चळवळी उभ्या केल्या. यासोबतच पर्यावरणवादी स्त्रीवादी इत्यादी चळवळी बळावलेल्या दिसतात.

**काँग्रेस अंतर्गत गटबाजी व फूट :**

यशवंतराव चव्हाणांनी स्वतःच्या कारकिर्दीत काँग्रेसमध्ये असणाऱ्या गटबाजीवर नियंत्रण ठेवलेले होते. इंदिरा गांधी यांच्या संघटनात्मक राजकारणाचा भाग म्हणून महाराष्ट्रातील स्थानिक प्रभावी मराठा नेत्यांचे खच्चीकरण करण्याची योजना राबविली म्हणजे मराठा नेतृत्वातील छुपी सत्तास्पर्धा वापरली. १९७७ मध्ये प्रथमच महाराष्ट्रात काँग्रेसला धक्का पोहचला तो अंशतः राष्ट्रीय राजकारणाच्या

परिणामातून आणि अंशतः बहुलवादी राजकारणापुढे निर्माण झालेल्या मर्यादामधून इंदिरा गांधीच्या झंझावातामुळे महाराष्ट्रातील काँग्रेस व्यवस्थेला तडे जाण्यास १९७२ पासून सुरुवात झाली होती. परंतु त्याचे परिणाम १९७७-७८ नंतर दिसू लागले. आणीबाणी विरोधी बातावरण काँग्रेस अंतर्गत असणारा बहुलवादी विरुद्ध लोकानुरंजनवादी संघर्ष, सत्ताकेंद्रामध्ये आकांक्षी राजकारण्यांना सामावून घेण्याची संपत आलेली कुवत, मराठा समाजातील वर्चस्वशाली घराण्याची ग्रामीण अर्थव्यवस्थेची पकड आणि मराठा नेतृत्वातील अंतर्गत स्पर्धा या सर्व घटकांचा परीणाम होऊन १९७८ मध्ये काँग्रेस वर्चस्वाची पडझड होण्यास सुरुवात झाली. १९७८ मध्ये इंदिरा निष्ठ आणि इंदिरा विरोधी असे काँग्रेसचे दोन गट पडले. इंदिरा विरोधी गटाचे ६९ आमदार निवडून आले त्यापैकी ४८ आमदार मराठा समाजाचे होते या गटाचे नेतृत्व शरद पवारांकडे होते. इंदिरानिष्ठ आमदारांची संख्या ६२ होती व त्यात २१ आमदार मराठा होते. एकमेकाविरुद्ध निवडणूक लढवण्याऱ्या दोन्ही काँग्रेस पक्षांनी वसंतदादा पाटील यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रातील पहिले संयुक्त सरकार स्थापन केले. परंतु या दरम्यान शरद पवार यांनी समाजवादी काँग्रेस हा नवा प्रादेशिक गट स्थापन केला आणि काँग्रेसचे संयुक्त मंत्रीमंडळ १८ जुलै १९७८ रोजी बरखास्त करीत जनता पक्ष आणि मित्र पक्षाच्या सहकार्याने पुरोगामी लोकशाही दलाचे पहिले बिगर काँग्रेस सरकार सत्तेवर आले. शरद पवारांच्या या बंडाला एकीकडे मराठा नेतृत्वातील गटबाजीची तर दुसरीकडे काँग्रेसच्या राष्ट्रीय राजकारणाची पार्श्वभूमी होती.

**दोन काँग्रेसच्या एकीकरणाचा प्रयोग :**

१९८० च्या विधानसभा निवडणूकीत विद्यापीठ नामांतरासारख्या निर्णयाने मतदार समाजवादी काँग्रेसवर नाराज झाला व इंदिरानिष्ठ काँग्रेसने १८६ जागांवर विजय मिळवून निर्विवाद बहुमत सिद्ध केले. १९८५ च्या निवडणुकीतही इंदिरानिष्ठ काँग्रेसला १६२ जागा मिळाल्या तर काँग्रेस (एस) ला १७ % ते २० % मतांवर समाधान मानावे लागले. काँग्रेस पक्षाच्या औपचारिक चौकटीबाहेर राहून मराठा समाजाचे हितसंबंध जपण्याचे राजकारण घडवणे शक्य होणार नाही याची खात्री पटल्यानंतर शरद पवारांनी १९८६ मध्ये औरंगाबाद येथे राजीव गांधीच्या उपस्थितीत काँग्रेस प्रवेश केला. १९८८ मध्ये शरद पवार काँग्रेसचे मुख्यमंत्री झाले.

१९७५ ते १९८८ या १३ वर्षाच्या काळात महाराष्ट्रात आठ वेळा मुख्यमंत्री बदलले. याला इंदिरा गांधीचे राजकारण आणि काँग्रेस अंतर्गत गटबाजी कारणीभूत होती. १९९० च्या विधानसभा निवडणूकीत शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्षाने १४१ जागा जिंकल्या व अपक्षांच्या पाठिंब्यावर त्यांचे सरकार सत्तेवर आले या निवडणुकीत काँग्रेस अंतर्गत पवारांचा एक गट स्वच्छपणे तयार झाला. १९८९ पूर्वीचे महाराष्ट्रातील राजकारण सर्वस्वी काँग्रेस केंद्रित होते. ९० च्या दशकात काँग्रेसला. काँग्रेसप्रणीत आघाडीला मध्यवर्ती स्थान असणारी परंतु काँग्रेस केंद्रीत नसणारी एक दुपाखी पक्षपद्धती महाराष्ट्रात साकारली. १९९० नंतर काँग्रेस स्वबळावर सत्ता टिकवू शकली नाही. तसेच याच काळात काँग्रेसचा जनाधार लक्षणीयरित्या कमी झाला. (बिरमल, २००७, पृ.५१)

**हिंदुत्ववादी शक्तींचा उदय आणि विकास :**

१९८० नंतर हिंदुत्ववादी पक्षाच्या वाढीची पार्श्वभूमी महाराष्ट्रात निर्माण होऊ लागली. १९८६

मध्ये शरद पवार काँग्रेसमध्ये गेल्याने मराठवाड्यात जी पोकळी निर्माण झाली तेथे शिवसेना पक्षाची वाढ झाली. शिवसेना प्रादेशिक पक्ष म्हणून विकसित होऊ लागला व शिवसेना भाजप युती १९९० नंतर काँग्रेसला पर्याय म्हणून उभी राहिली. हिंदूत्ववादी राजकारण ग्रामीण भागात व ब्राम्हणेतर समाजामध्ये लोकप्रिय करण्यात शिवसेना व भारतीय जनता पक्षांना काही प्रमाणात यश आले. शिवसेनेने मराठी अस्मितेची सांगड हिंदुत्वाच्या अभिमानाशी घातली त्यासाठी शिवाजी महाराजांच्या प्रतिकांचा वापर केला. भाजपाने राम मंदिराच्या निमित्ताने हिंदू ऐक्य साधण्याचा प्रयत्न केला मात्र महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात हिंदुत्वाच्या राजकारणाचा प्रचार शिवसेनेनेच केला. शिवसेनेच्या शाखा प्रत्येक गावामध्ये निर्माण होऊन तरुणांच्या फौजा लढाऊ संघटनेकडे वळल्या. सत्ता मिळण्याच्या संधीमुळे अनेक कार्यकर्ते शिवसेनेकडे आकर्षित झाले. शिवसेनेने पक्षबांधणीसाठी स्थानीय लोकाधिकार समिती, शिवसेना महिला आघाडी, गिरणी कामगार सेना, महापालिका कामगार सेना, बेस्ट कामगार संघटना, ग्राहक संरक्षण कक्ष, विद्यार्थी सेना, सिनेकामगार सेना, एस.टी. कामगार संघटना, शेतकरी सेना यासारख्या संघटनांचा आधार घेतला. शिवजयंती धुमधडाक्यात साजरी करणे, मुस्लिम विरोधी भूमिका हिंदू – मुस्लिम दंगलीमध्ये घेणे इतर स्थानिक हिंदुत्ववादी संघटनांचा पाठिंबा दलित विरोध यामुळे हिंदुत्ववादाचा प्रसार महाराष्ट्रात झपाट्याने झाला.

१९९० नंतर कोणत्याही किरकोळ कारणावरुन हिंदू – मुस्लिम दंगल होईल अशा वातावरणाची निर्मिती महाराष्ट्राच्या सर्वच भागामध्ये झाली. यातून सेना भाजपचे राजकारण स्थिरावण्यास सुरुवात झाली. महाराष्ट्रातील अनेक भागामध्ये पतित पावन संघटना, हिंदू एकता आंदोलन यासाख्या आक्रमक संघटना उभ्या राहिल्या. हिंदुत्ववादी पक्ष विस्तारासाठी परस्पर सहकार्य, काँग्रेसविरोधी एकजूट व पक्षाला फायदेशीर असा तर्कसंगत पर्याय इ. कारणांमुळे शिवसेना भारतीय जनता पक्षाची युती झाली. भाजपने पक्ष संघटनेचा विस्तार करण्यासाठी भारतीय कामगार संघ, ग्राहक पंचायत, आझादी बचाओ आंदोलन, वनवासी कल्याण आश्रम, संस्कार भारती, समरसता मंच, ज्ञानप्रबोधनी तसेच पुणे शहरातील शिक्षणसंस्था, नागरी सहकारी बँका व संघ परिवार या संघटनामार्फत पक्षाचा आधार व्यापक बनवण्याचा प्रयत्न झाला असला तरी भाजपवर संघपरिवाराचे प्रभुत्व राहिलेले आहे.

**महाराष्ट्रातील सत्तांतर आणि आघाडीचे राजकारण :**

१९९५ मध्ये हिंदुत्ववादी पक्षांना सत्ता संपादन करण्यात प्रथमच यश आले. एका प्रबळ पक्षपद्धतीचा ऱ्हास झाला. काँग्रेस प्रथमच महाराष्ट्राच्या विधानसभेत विरोधी पक्षाची भूमिका पार पाडू लागला. १९९५ च्या विधानसभा निवडणुकीमध्ये सेना – भाजप युतीने १३८ जागा जिंकून अपक्ष आणि काँग्रेस बंडखोरांच्या मदतीने सरकार स्थापन केले. काँग्रेस पक्षातील गटातटाचे राजकारण, प्रस्थापित घराणेशाही विरुद्ध नाराजी, मुंबई दंगलीच्या काळातील युतीचे आक्रमक राजकारण, विदर्भ, मराठवाडा, कोकण विभागातील जनतेमध्ये राज्यकर्त्यांनी आपल्याकडे सतत दुर्लक्ष केल्याची भावना व काँग्रेसच्या पाठीमागे असणारा मराठा – कुणबी आणि इतर मागासवर्ग जातीगटात झालेली मतविभागणी या सर्व गोष्टीचा एकत्रित परिणाम म्हणजे महाराष्ट्रातील सत्तांतर होय. यासोबतच काँग्रेस पक्षात प्रचंड मोठ्या प्रमाणात बंडखोरी झाली ही बंडखोरी काँग्रेसच्या पराभवाचे एक प्रमुख कारण आहे. ३५ जागांवर बंडखोर निवडून आले तर २४ जागावर मतविभागणीमुळे काँग्रेसचा पराभव झाला

व खऱ्या अर्थाने बिगर काँग्रेस सरकार महाराष्ट्राच्या सत्तेवर आले. या निवडणुकीत काँग्रेस पक्षाला फक्त ८० जागा जिंकता आल्या.

सोनिया गांधी यांची काँग्रेस नेतेपदी झालेली निवड विरोधी पक्षनेते असलेल्या शरद पवारांना अस्वस्थ करणारी ठरली. नेतृत्वाची महत्वकांक्षा असलेल्या पवारांनी सोनिया गांधी यांना विरोध करत १० जून १९९९ रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना केली. पवारांचे हे बंड श्रीमंत मराठा शेतकऱ्यांचे व निमशहरी भागातील शेतकरी जातीचे हितसंबंध जपण्यासाठी होते. १९९९ च्या विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसमुळे महाराष्ट्राच्या राजकारणातील गुंतागुंत अधिक वाढली. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, सेना-भाजप युती व तिसऱ्या आघाडीतील पक्ष या बहुपक्षीय स्पर्धेत त्रिशंकु विधानसभा अस्तित्वात आली. काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसला स्पष्ट बहुमत नसल्याने जनता पक्ष, शेकाप, बहुजन महासंघ रिपब्लीकन पक्ष यांनाही मंत्रीमंडळात स्थान दिले व यांच्यासोबत आघाडी करून सत्ता स्थापन केली. १९९९ च्या निवडणूकीत सेना भाजपला १२५ जागा मिळूनही सत्ता स्थापन करु शकले नाहीत. कारण गणेश नाईक, सुरेश जैन व ओबीस समाजाचे नेते छगन भुजबळ राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये आले. आण्णा हजारे यांनी युतीच्या चार मंत्र्यावर केलेले भ्रष्टाचाराचे आरोप व मराठा नेतृत्वाची सेनेकडून झालेली नाराजी यामुळे युतीचा पराभव झाला.

२००४ च्या विधानसभा निवडणुकीमध्ये काँग्रेस - राष्ट्रवादी आघाडीने १४० जागांवर विजय मिळवून सत्ता स्थापन केली. युतीला मात्र ११६ जागांवर समाधान मानावे लागले. सुहास पळशीकर यांच्या मते, १९९० नंतर द्विध्रुवीय राजकारणाला छेद देणारे तिसऱ्या आघाडीचे राजकारणसुद्धा समांतरपणे घडत होते. सेना भाजप युतीच्या उदयामुळे जे पक्ष सिमांत ठरले त्यांनी सतत या प्रकारचे तिसऱ्या आघाडीचे राजकारण केले. पक्षीय स्पर्धा जरी द्विध्रुवीय चौकटीत होत असली तरी महाराष्ट्राचं पक्षीय राजकारण बहुध्रुवीय बनले आहे. विधानसभा व लोकसभा एकत्र लढवणारे काँग्रेस राष्ट्रवादी काँग्रेस स्थानिक निवडणूका मात्र एकत्र लढवत नाही. कारण पक्ष विस्तारासाठी चाललेली त्यांची ती स्पर्धा असते.

**ओबीसी नेतृत्वाचा उदय :**

१९९० नंतर ओबीसी राजकारण महाराष्ट्रात आकार घेऊ लागले. भाजपने गोपीनाथ मुंढे तर राष्ट्रवादी काँग्रेसने छगन भुजबळ यांना उपमुख्यमंत्रीपदे दिले व बिगर मराठा नेतृत्वाला वाव दिला परंतु यांच्या नेतृत्वावर मराठा नेतृत्वाच्या मर्यादा होत्या. भाजपने आपला सामाजिक पाया व्यापक करण्यासाठी इतर मागासवर्गीय जातीच्या नेत्यांना व कार्यकर्त्यांना संघटनेत संधी दिली. यातुन ना. स. फरांदे (माळी), आण्णा डांगे (धनगर) गोपीनाथ मुंडे (वंजारी), सूर्यभान वहाडणे (मराठा) हे नेतृत्व पुढे आले व भाजपचा विस्तार ग्रामीण भागातही झाला. मंडल आयोगानंतर ज्याप्रमाणे भारतात ओबीसीचे स्वतंत्र राजकारण उभे राहिले तसे महाराष्ट्रात झाले नाही. कारण महाराष्ट्रातील ओबीसी समाजाने प्रस्थापित जातींच्या विरोधी जाऊन वेगळा पक्ष स्थापन न करता, प्रस्थापितांना पाठींबा देण्याच्या माध्यमातून राजकारण केले. तसेच प्रस्थापितांनीही ओबीसींना स्वतःच्या पक्षात जाणीवपूर्वक सामील करून घेण्याचे प्रयत्न केले.

**मराठी अस्मितेचे राजकारण :**

मराठी अस्मितेचे राजकारण २० व्या शतकाच्या उत्तरार्धात संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या माध्यमातून सक्रिय झाले. परंतु महाराष्ट्र निर्मिती नंतर मराठी अस्मिता थंडावत असतांनाच १९६६ मध्ये मुंबई येथे मराठी भाषिक अस्मितेच्या आधारे शिवसेना पक्षाचा उदय झाला. या पक्षाने पुढे सुमारे चार दशके मराठी अस्मिता व हिंदुत्वाचे राजकारण केले. २१ व्या शतकाच्या पहिल्या दशकामध्ये बाळासाहेब ठाकरे यांच्या वाढत्या वयासोबत वचक कमी होणे, ठाकरे शैली असलेले राज ठाकरे यांना डावलून उद्धव ठाकरे यांचे शिवसेनेतील होणारे महत्व, नारायण राणे, छगन भुजबळ इ. सारख्या नेत्यांचा शिवसेनेला जय महाराष्ट्र, राज आणि उद्धव यांच्यातील अंतर्गत संघर्ष या प्रश्नांनी शिवसेना ग्रासली होती. २००६ मध्ये राज ठाकरे यांनी आपल्या समर्थकांसह शिवसेनेतुन फुटुन निघून महाराष्ट्र नवनिर्माण सेना हा पक्ष स्थापन केला. राज ठाकरे यांच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेमुळे मराठी अस्मितेच्या राजकारणात आणखी भर पडली. परंतु त्यावेळी मराठी मतांची विभागणी या दोन पक्षात झाली. २००९ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत मनसेला पहिल्याच प्रयत्नात १३ जागा मिळाल्या, शिवसेनेला मात्र ४४ जागांवर समाधान मानावे लागले. २००४ च्या निवडणुकीत शिवसेनेला ६२ जागा मिळाल्या होत्या. त्यांच्या १८ जागा कमी झाल्या. या सोबतच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतील शिवसेनेला मोठा फटका सहन करावा लागला. कारण राज ठाकरे हे बाळासाहेब ठाकरे यांच्या तालमीत घडले असल्याने त्यांची शैली, वाक्चातुर्य, आक्रमकपणा या गुणांवर बाळासाहेब ठाकरे यांची विलक्षण छाप होती.

या काळात राज ठाकरे यांनी दुकाने, कार्यालये, हॉटेल यांच्या पाट्या मराठीतूनच असाव्या, टैक्सी, रिक्षा चालक, पानपट्टीवाले, हातगाडीवाले, छोटे विक्रेते यांनी मराठीतूनच ग्राहकांशी संवाद साधावा, महाराष्ट्राचे प्रशासन, कंपन्या, कारखाने, खाजगी संस्था यामध्ये मराठी तरुणांनाच नोकरीसाठी प्राधान्य द्यावे, रेल्वे बोर्ड इ. परीक्षा मराठीतुनच घेण्यात याव्या. मुंबईतील परप्रांतीयांनी मराठीचे अनुकरण व आदर करावा, मुंबईतील गिरणी कामगारांच्या संपाला पाठींबाच्या आधारे राजकारण करून शिवसेनेचे मराठी अस्मितेचे मुद्दे न घेतले. थोडक्यात राज आणि उद्धव ठाकरे यांनी परस्पर विरोध करून मुंबईमधील मराठी अस्मितेच्या राजकारणावर पकड कायम ठेवलेली आहे.

**पक्षांतर्गत संघर्ष व गटबाजी :**

२१ व्या शतकाच्या पहिल्या दशकामध्ये पक्षांतर्गत संघर्षांना उधान आल्याचे दिसते. कॉंग्रेस पक्षामध्ये विलासराव देशमुख, अशोक चव्हाण, नारायण राणे, पतंगराव कदम, गोविंदराव आदिक, प्रभा राव यांच्यात संघर्ष निर्माण झाल्याचे दिसते. राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये छगन भुजबळ, अजित पवार, मोहिते, ढोबळे, पिचड, शालीनीताई पाटील यांच्यातील अंतर्गत संघर्ष निर्माण झाला. भारतीय जनता पक्षामध्ये गोपीनाथ मुंडे, नितीन गडकरी, जयसिंग गायकवाड, फुंडकर, वहाडणे, खडसे या नेत्यामध्ये पक्षांतर्गत संघर्ष आहे. तर शिवसेनेमध्ये संजय राऊत, सत्यभामा गाडेकर, निलम गोऱ्हे, दिवाकर रावते असा अंतर्गत संघर्ष पक्षातील पद, निर्णयातील मतभेद इत्यादीबाबत असलेले दिसतात. त्याचबरोबर बंडखोर, अपक्ष, छोटे पक्ष इत्यादी घटकांचा सत्ताकारणातील हस्तक्षेप वाढत होता. १९९५ मध्ये ५ बंडखोर अपक्षांना मंत्रीपदे दिली तर १९९९ व २००४ मध्ये अनुक्रमे तीन व दोन मंत्रीपदाचे वाटप या घटकांना करण्यात आले.

**दलित राजकारण :**

दलित पँथरच्या उदयानंतर दलित चळवळीने १९७७ मध्ये चवदार तळ्याच्या सत्याग्रहास ५० वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने औरंगाबाद येथील मराठवाडा विद्यापीठास डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव द्यावे ही मागणी पुढे रेटली. १९७८ मध्ये हा ठराव मंजूर करण्यात आला. मात्र मराठवाड्यामध्ये दलित विरोधी दंगली व हिंसाचारामुळे नामांतराचा निर्णय सरकारने मागे घेतला. यानिमित्ताने दलित पँथर संघटना संपूर्ण महाराष्ट्रात गाजली. १९८० च्या विधानसभा निवडणूकीत रिपब्लिकन पक्षातील खोब्रागडे गटाला एक जागा, १९८५ मध्ये एकही जागा जिंकता आली नाही. १९९० मध्ये पुन्हा खोब्रागडे गटाला एक जागा विधानसभा निवडणुकीत मिळाली. थोडक्यात १९९० च्या दशकामध्ये रिपब्लिकन पक्षाला यश मिळवता आले नाही. १९८४ मध्ये प्रकाश आंबेडकरांच्या नेतृत्वाखालील गटाने गायरान जमिनी व भूमिहीनता या प्रश्नावरील आंदोलने उभी करुन दलित राजकारणाची कोंडी फोडण्याचा प्रयत्न केला. मात्र दलित नेतृत्वातील फाटाफूट आणखी वाढली १९८९ मध्ये काँग्रेस युतीसाठी अनुकूल व प्रतिकूल अशी विभागणी नेतृत्वात झाली. १९९४ मध्ये नामांतराची चळवळ यशस्वी झाली व मराठवाडा विद्यापीठास डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव दिले.

१९९५ नंतर महाराष्ट्राचे दलित राजकारण आणखी विखुरलेले दिसते. हिंदुत्ववादी पक्षांनी मातंग आणि चर्मकारांना मोठ्या प्रमाणात उमेदवारी देऊन आपल्याकडे आकर्षित केले होते. त्यांना मंत्रीमंडळातही युतीने स्थान दिल्याने इतकी वर्ष काँग्रेसच्या मागे राहुनही मातंग चर्मकारांना मंत्रीपदे मिळत नव्हती. त्यामुळे हिंदू दलित काँग्रेस पासून वेगळा झाला. १९९६ मध्ये रिपब्लिकन पक्षात ऐक्य निर्माण झाले. परंतु १९९७ मध्ये पक्षातील पद वाटपाच्या भांडणात पक्ष पुन्हा फुटला प्रकाश आंबेडकर, राजा ढाले, बी.सी. कांबळे यांचा एक गट तर गवई, आठवले, कवाडे यांचा दुसरा गट स्थापन झाला. फुटीनंतर नामदेव ढसाळ यांनी दलित पँथरचे पुनरुज्जीवन केले. १९९९ च्या निवडणुकीत युतीसाठी आठवले गटात फूट पडली गवई कवाडे काँग्रेस सोबत तर आठवले राष्ट्रवादी सोबत गेले. निवडणुकांमध्ये १९९५ मध्ये पक्षाला पूर्ण अपयश आले.

१९९९ मध्ये ०१, २००४ मध्ये ०१, २००९ मध्ये पुन्हा अपयश या पेचामध्ये पक्ष सापडलेला आहे. २००९ च्या शिर्डी लोकसभा मतदार संघामधून राष्ट्रवादी काँग्रेसने आठवले यांना उमेदवारी दिली होती मात्र काँग्रेसने त्याबद्दल तटस्थ भूमिका घेतल्याने चर्मकार समाजाचे भाऊसाहेब वाघचौरे निवडून आले. २००९ च्या निवडणुकीत आठवले गटाने रिडालोस आघाडीमध्ये सहभाग घेतला होता. १९९० च्या दशकात स्थापन झालेला बहुजन समाज पक्ष स्वतःकडे दलित मते आकर्षित करण्याचा प्रयत्न करत होता मात्र महाराष्ट्रात मर्यादा असल्यामुळे आपले अस्तित्व हा पक्ष वाढवु शकला नाही. अलिकडे चर्मकार व नवबौद्धातील काही गट बहुजन समाज पक्षाच्या पाठीमागे जाताना दिसत आहेत. २०११ मध्ये रिपब्लिकन पक्षाचा (आठवले) केविलवाणा प्रयोग म्हणून शिवशक्ती भीमशक्ती एकीकरण शिवसेना पक्षासोबत केले. परंतु याला दलित समाजातूनच विरोध झाला.

२०१९ साली महाविकास आघाडीचे सरकार स्थापन झाल्यापासून राज्यातील राजकारण हे नेहमीच अस्थिर राहिले. सरकार स्थापन झाल्यापासूनच भाजपचे नेते सरकार कधी कोसळणार, याच्या तारखा सांगत होते. दरम्यान, मविआतील तीन नेत्यांना गंभीर आरोपांमुळे तुरुंगात जावे

लागले. त्यामुळे अडीच वर्षांच्या काळात ठाकरे सरकारने अक्षरशः विरोधकांचा मारा चुकवत-चुकवत दिवस काढले. या काळात कधी राजकीय भूकंप होऊन सरकार कोसळेल, याचा नेम नव्हता. मविआला सत्तेतून खाली खेचण्यासाठी भाजपने संपूर्ण ताकद लावून प्रयत्न केले. पण या सगळ्या संकटांमधून सहीसलामत निसटून महाविकास आघाडी कशीबशी तग धरून होती.

या काळात पोटनिवडणुका, राज्यसभा आणि विधानपरिषद निवडणुकीच्या निमित्ताने अनेक राजकीय चमत्कारही पाहायला मिळाले. मात्र, या सगळ्याचा कळस गाठला गेला तो एकनाथ शिंदे यांच्या बंडाने. एकनाथ शिंदेंनी उद्धव ठाकरे यांचा तो अंदाज खोटा ठरवला. त्यांनी दोन तृतीयांश आमदार, खासदार आणि पदाधिकारी फोडून संपूर्ण शिवसेनेतच फुट पाडली. त्यापुढे जात एकनाथ शिंदे यांनी संपूर्ण शिवसेनेवरच दावा सांगितला. त्यामुळे ठाकरे घराण्याची ताकद असलेला शिवसेना पक्षच उद्धव ठाकरे यांच्या हातातून निसटण्याची शक्यता आहे. तसे घडल्यास हे महाराष्ट्राच्या राजकारणातील दूरगामी परिणाम करणारे स्थित्यंतर ठरेल.

**समारोप :**

२०१० नंतरचे दशक महाराष्ट्रातील सत्तांतर, काँग्रेस व काँग्रेस धुरिणांचा पराभव, विविध जनसमूहांचे व संघटनांचे राजकारण त्यामुळे अस्वस्थ दशक असे राहिले. ऑक्टोबर २०१४ मध्ये २८८ जागांसाठी महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणूका पार पडल्या. यात भाजपा १२२, शिवसेना ६६, काँग्रेस ४२, राष्ट्रवादी काँग्रेस ४१ अशा जागा प्रमुख पक्षांना मिळाल्या. शिवसेनेचा बाहेरून पाठिंबा घेऊन देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली भाजपाने सत्ता स्थापन केली. सत्ता जाण्याची काँग्रेसची ही पहिली वेळ नव्हती परंतु २०१४ मध्ये काँग्रेस पक्षाला जो पराभव पत्करावा लागला त्या कामगिरीतील अपयश आणि उद्देशहीनता या दोघांचा परिणाम आहे. १९ टक्के मते मिळूनही केवळ ४२ जागा असणे हा मोठा पराभव होता. या निवडणुकीत काँग्रेस पक्षाला अंतर्गत धक्का बसला तो म्हणजे २०१२ मध्ये विलासराव देशमुख यांचे झालेले निधन होय, कारण ते जरी दिल्लीत असले तरी महाराष्ट्र काँग्रेसचे महत्त्वाचे निर्णय घेणारे नेते होते. त्याचप्रमाणे लोकसभा निवडणुकीत प्रचंड बहुमतांनी निवडून आलेले गोपीनाथ मुंडे यांचे जून २०१४ मध्ये झालेले अपघाती निधन होय. दुखावलेला वंजारी समाज पंकजा मुंडे व पर्यायाने भाजपाच्या पाठिशी राहिला.

छगन भुजबळ यांच्यावरील आरोप, त्यांना केलेली अटक तसेच भुजबळांची सर्व बाजूंनी केलेली कोंडी यामुळे माळी समाज आणि त्यांच्या समर्थकांमध्ये भाजपाविरूध्द असंतोष तर निर्माण झालाच परंतु राष्ट्रवादी काँग्रेसबद्दल अनेकांच्या मनात साशकताही निर्माण झाली होती. याचा परिणाम येणाऱ्या काळातील राजकारणावर होणार आहे. देशपातळीवर निर्माण झालेले प्रश्न जसे लोकपाल विधेयक, महागाई, भ्रष्टाचार, राहुल गांधींचे लोकमान्यता नसलेले नेतृत्व हे मुद्दे काँग्रेस पक्षाला घातक होते तर भाजपाच्या काही जमेच्या बाजू होत्या त्या म्हणजे नरेंद्र मोदींची लाट व त्यांची भुरळ टाकणारी भाषणे, धनगर समाजाचे महादेव जानकर व स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे राजु शेट्टी, रिपाइंचे रामदास आठवले, मराठा संघाचे विनायकराव मेटे हे महाराष्ट्र भाजपाच्या पाठीशी राहिले. शेतकऱ्यांचे प्रश्न आणि डबघाईला आलेले सहकार क्षेत्र यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसला निवडणुकीत १९ जागा गमवाव्या लागल्या.

१९९० नंतर महाराष्ट्राच्या राजकारणात आघाड्याचे महत्व सतत टिकून राहिलेले आहे. कोणताही एक पक्ष बहुमत सिध्द न करता इतर पक्षाच्या मदतीने सत्ता स्थापन केली जाऊ लागली या प्रकारच्या राजकारणात राजकीय सौदेबाजीस महत्त्व प्राप्त होऊ लागले. उदा. २००९ च्या विधानसभा निवडणुकानंतर काँग्रेस-राष्ट्रवादी मध्ये खाते वाटपावरून झालेला वाद होय. २१ व्या शतकाच्या दुसऱ्या दशकात महाराष्ट्राचे राजकारण मराठा मूक मोर्चा व मराठा आरक्षण, कोपर्डी बलात्कार प्रकरण, अॅट्रासिटी मुद्दा, अनुशेषाच्या मुद्यावरुन विदर्भाची स्वतंत्र राज्याची मागणी, भ्रष्टाचार, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न, गिरणी कामगारांचा प्रश्न, आदर्श घोटाळा, जैतापूर अणू ऊर्जा प्रकल्प, नाणार प्रकल्प, समृध्दी महामार्गासाठी वादग्रस्त जमीनींचे अधिग्रहण, महागाई, शेतीप्रश्न इत्यादी मुद्दे हाती घेऊन सुरूवातीला काँग्रेसविरोधी आणि नंतर भाजपाविरोधी राजकारण करण्याचा प्रयत्न महाराष्ट्रात होत आहे. तसेच निवडणुकींच्या राजकारणात बंडखोरी, पक्षांतर, पक्षांतर्गत गटबाजी, परस्पर विरोधी विचारसरणी असलेल्या पक्षाची आघाडी या सर्व कारणांमुळे राजकारणातील स्पर्धात्मकता आणि गुंतागुंत वाढत चालली आहे.

### संदर्भ


- Desphande Rajeshwari and Nitin Birmal, 2009, Maharashtra:Congress-NCP Manages Victory, Economic and Political Weekly, XLIV (39), September 26,
- Palshikar Suhas, 2014, Maharashtra -ssembly Elections Farewell to Maratha Politics? Economic and Political Weekly, Vol. XLIX No.43 44, Nov 2014, 10-13.
- Palshikar Suhas, 2018, Towards Hegemony: BJP beyond Electoral Dominance, Economic and Political Weekly, Vol. LIII No.33, 18 -ug.2018, 36-41.
- घोटाळे विवेक, २०११ महाराष्ट्राचे राजकारण, तुकाराम जाधव (संपा), वार्षिकी २०११ महाराष्ट्र, पुणे, युनिक, पृ. ६१५-६३१.
- घोळवे सोमनाथ,२०१५, २०१४ ची निवडणूक आणि जातींच्या राजकारणाचा आषय, कुभार नागोराव(संपा),विचारशलाका लोकसभा निवडणूक विषेशांक, लातूर, पृ.११३-१२०
- जगझाप हर्ष व सोनवणे संघरत्न, २००९, महाराष्ट्रातील आंबेडकरी राजकारणाचे समकालीन आकलन, पुणे, बुद्धीष्ट मीडीया सेंटर.
- पळशीकर सुहास, २०१४, देश प्रदेश प्रादेशिक राजकारणाच्या बदलत्या दिशा, पुणे, द युनिक अॅकॅडमी.
- पळशीकर सुहास व बिरमल नितीन (संपा) २००७, महाराष्ट्राचे राजकारण: राजकीय प्रक्रियेचे स्थानिक संदर्भ, पुणे, प्रतिमा.
- पळशीकर सुहास व कुलकर्णी सुहास (संपा)२००७, महाराष्ट्रातील सत्तासंघर्ष राजकीय पक्षांची वाटचाल, पुणे, समकालीन.


□□□